**CNR MHRG040006052012**

## वि.दि.मु.क्र.४५१/२०१२ मधील नि.
## दिनांक ०३/१०/२०२२ रोजी दाखल अर्जावरील आदेश

(श्री. तुकाराम दत्तात्रेय पाटील व इतर
विरुध्द
श्री. गणू बाळू पाटील व इतर )

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम १० प्रमाणे दाव्यात पक्षकार म्हणून सामील करण्यासाठी दाखल केला आहे.

<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :-

२. सदरचा दावा हा वादीने समस्त मौजे मोहो, ता.पनवेल गावचे मालकी व वहिवाटीची दाव्यामध्ये उल्लेखित जमीन मिळकतीबाबत दाखल केला आहे. सदर दाव्याकामी प्रतिवादी यांना समस्त गावाचे पंच वहिवाटदार म्हणून नोंदवलेले आहे. सदरची दावा मिळकत ही वादी क्र.६ यांच्याकडून वहिवाटीसाठी व गावातील गुरे चरण्यासाठी बक्षिस पत्राने दिली होती. सदर अर्जदाराचा इतर इसमांप्रमाणे शेती व दुग्ध उत्पादनाचा व्यवसाय आहे. त्यामुळे विना अडथळा दावा मिळकतीचा गुरे चरण्यासाठी वापर करता यावा या उद्देशाने त्याने सदर दाव्यात त्यांना पक्षकार म्हणून सामील करण्यासाठी अर्ज दिला आहे. अर्जदाराचे पुढे म्हणणे असे की, मुळ रे.मु.नं.१७/२००८ हा दावा दाखल झाला त्यावेळेस देखील पक्षकार म्हणून सहभागी करण्यासाठी त्यांनी अर्ज दाखल केला होता. परंतु, तो दावा वादीने मागे घेवून नवीन दावा दाखल केल्यामुळे दाव्यातील अर्जावर निकाल झाला नाही. त्यामुळे त्यांना दाव्याकामी सामील करण्याची त्यांनी विनंती केली.

३. वादीने सदर अर्जास कोणतीही हरकत नसलेबाबत म्हणणे दाखल केले आहे. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

४. सदर अर्जदाराने त्याच्या अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर अर्जदार मोहो गावातील रहिवासी असून प्रस्तुत दावा वादीने प्रातिनिधिक स्वरुपात दाखल केला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता तसेच वादीची हरकत

नसल्याने सदर अर्जदारांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे न्यायाचे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करते-

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार जयदास माया म्हात्रे व संजय नागा भोईर यांना पक्षकार म्हणून दाव्यात वादीने सामील करावे व त्याप्रमाणे दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

AVANI ASHWIN GODSE
Digitally signed by AVANI ASHWIN GODSE
Date: 2022.12.19 16:08:50 +0530

पनवेल {अ.अ. गोडसे}
दिनांक :१९/१२/२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,पनवेल
जिल्हा-रायगड.